# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल केलेली तक्रार क्र.रामाआ नाशिक/तक्रार क्र.११/२०२४/नाशिक मधील शास्तीचे प्रकरण**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| | जन माहिती अधिकारी |
| ॲड दिलावरखान पठाण,<br>रा.२१८ बी, मेघदूत शॉपींग सेंटर, दुसरा मजला,<br>सी.बी.एस., नाशिक ता.जि.नाशिक. | उप अभियंता,<br>नगरनियोजन विभाग,<br>नाशिक महानगरपालिका, राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक ता.जि.नाशिक. |

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

## विवेचन

तक्रारदार यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रार क्र.११/२०२४/नाशिक संदर्भात दि.१४/०७/२०२५ रोजी झालेल्या सुनावणीत आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत.

"तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगरनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा सदर आदेश प्राप्तीनंतर १५ दिवसांच्या आंत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी."

२. आयोगाच्या उपरोक्त आदेशास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगरनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक श्री.रविंद्र बागुल यांनी आयोगाकडे दि.२९/०१/२०२६ अन्वये लेखी खुलासा सादर केला असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, मा.राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक यांचेकडून दि.१४/०७/२०२५ रोजी झालेल्या सुनावणीचे आदेश इकडील कार्यालयाकडे दि.२३/१२/२०२५ रोजी प्राप्त झालेला आहे. सदर अपिलात तक्रारदार ॲडदिलावरखान पठाण यांनी इकडील कार्यालयाकडे दि.०६/०७/२०२१ रोजी माहिती अधिकारांतर्गत अपेक्षिलेली माहिती पुरविलेली नसल्याने राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक यांचेकडे द्वितीय अपिल क्र.४४४/२०२२ दाखल केले होते. सदर अपिलाची सुनावणी दि.०३/०८/२०२२ रोजी होऊन मा.राज्य माहिती आयुक्त यांनी जा.क्र.रामाआ/द्वि.अ.क्र.४४४/२०२२/नाशिक/ओ-२०९६, दि.१९/१०/२०२२ रोजी पारित आदेशानुसार १५ दिवसांच्या आंत विनामूल्य माहिती पुरविणेबाबत कळविण्यात आले होते. सदर माहिती वेळेत न मिळाल्याने तक्रारदार यांनी ११/२०२४ अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीची सुनावणी दि.१४/०७/२०२५ रोजी पूर्ण होऊन दि.१२/१२/२०२५ रोजी यावर आदेश निर्गमित झाले आहेत. सदर सुनावणी आदेशान्वये तक्रारदार यांना इकडील कार्यालयाने यापूर्वी दि.१५/०९/२०२२ रोजी माहिती पुरविण्यात आली होती. तक्रारदार यांना पुनश्च: दि.२५/१२/२०२५ रोजी माहिती पुरविण्यात आली आहे. तरी त्याबाबत तक्रारदार यांना माहिती मिळालेबाबत मा.राज्य माहिती आयुक्त यांचेकडे दि.२५/१२/२०२५ चे पत्रान्वये खुलासा केला आहे त्याची प्रत सोबत जोडली आहे. त्यानुसार तक्रार क्र.११/२०२४ निकाली काढण्यात यावी ही विनंती.

३. आयोगाकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, आयोगाने द्वितीय अपिल क्र.४४४/२०२२ संदर्भात दि.०३/०८/२०२२ रोजी झालेल्या सुनावणीत दिलेल्या आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगरनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी तक्रारदार यांना दि.१५/०९/२०२२ च्या पत्रान्वये माहिती पुरविली असून सदरची माहिती मिळाल्याबाबत अपिलार्थी यांनी सदर पत्रावर

स्वाक्षरी केलेली आहे. तसेच तक्रारदार यांनी दि.२५/१२/२०२५ अन्वये आयोगास लेखी निवेदन सादर केले असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, नगररनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांच्याकडे दि.०६/०७/२०२१ रोजी माहिती अधिकार अर्ज देऊन नाशिक पूर्व, पश्चिम, पंचवटी, सातपूर, नाशिकरोड, नविन नाशिक या सर्व विभागांतील गोठे व तबेले यांच्यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली होती. माहिती अर्धवट असल्याने अपिल करण्यात येऊन त्यामध्ये माहिती देण्याचे आदेश झाले होते. परंतू वेळेत माहिती न मिळाल्याने क्र.११/२०२४, दि.०१/०१/२०२४ ची तक्रार केली होती. सदर तक्रारीनंतर मला नगररनियोजन विभागाकडून माहिती प्राप्त झाली आहे. त्यासंदर्भात माझी तक्रार नाही. तरी तक्रार क्र.११/२०२४, दि.०१/०१/२०२४ चा अर्ज निकाली काढण्यात यावी ही नम्र विनंती.

उपरोक्त वस्तुस्थिती पाहता, आयोगाने द्वितीय अपिल क्र.४४४/२०२२ संदर्भात दि.०३/०८/२०२२ रोजी झालेल्या सुनावणीत दिलेल्या आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, नगररनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक (श्री.रविंद्र बागुल) यांनी दि.१५/०९/२०२२ च्या पत्रान्वये तक्रारदार यांना त्यांच्या कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. तसेच तक्रारदार यांनी देखील माहिती मिळाली असून काही तक्रार नाही तरी दि.०१/०१/२०२४ अन्वये दाखल केलेली तक्रार निकाली काढण्यात यावी अशी विनंती केलेली असल्यामुळे अन्वये तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, नगररनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक (श्री.रविंद्र बागुल) यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) नुसार कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१) तक्रारदार यांना माहिती मिळाली असून मिळालेल्या माहितीबाबत त्यांची काही एक तक्रार नसल्याने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, नगररनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक (श्री.रविंद्र बागुल) यांच्याविरुध्द प्रस्तावित कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

२) प्रस्तुत तक्रार क्र.११/२०२४/नाशिक अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

( भूपेन्द्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

जा.क्र. ८८३ , दिनांक :- 03 FEB 2026